Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

February 2020 Special Issue- 22 Vol. 6

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal, Dr.Aqueela Syed Gous

**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**February 2020 Special Issue- 22 Vol. 6**

# The Role of Women in Global Development

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal, Dr.Aqueela Syed Gous**

**Shaurya Publication, Latur**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22 , Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# Index

1. राष्ट्रीय विकास एवं महिला सशक्तिकरण — १
डॉ. सय्यद अमर फकिर

2. भारत देश के आजादी के लिए योगदान देनेवाली क्रांतीकारी महिला - दुर्गावती देवी (दुर्गाभाभी) — ३
प्रा. गडदे भारती बाबुराव

3. न्यायालयाची भूमिका आणि भारत — ५
प्रा.दत्तात्रय जनार्धन चव्हाण

4. गोदाकाठावरील महानुभावीय साहित्यातून अभिव्यक्त होणारी एकात्मता — ९
डॉ. बबन श्रीकृष्ण मस्के

5. कृषी क्षेत्र आणि आर्थिक विकास — 12
डॉ. अशोक बापूराव देवकर

6. 'जागतिक मानव विकास अहवाल आणि भारताची सद्यस्थिती' — १६
प्रा. डॉ. चव्हाण एम.एच., प्रा. डॉ. सावळे एकनाथ ग्यानोबा

7. कृषी विकास आणि भारतीय अर्थव्यवस्था — २०
डॉ. देविदास नागरगोजे, डॉ. सावळे ई.जी.

8. भारतीय स्वातंत्र्यपूर्व आंदोलनात महिलांचा सहभाग — 24
डॉ. किसन मनोहर पवार

9. स्त्रियांच्या सामाजिक समस्या आणि उपाय योजना — २६
डॉ.सौ.मनिषा देशमुख

10. भारतीय शेती शोध आणि बोध — २८
डॉ.एन.के.मुळे

11. महिलांच्या समस्या : "एक अभ्यास" — ३१
प्रा. डॉ. शामल भिवराव जाधव

12. भारतीय क्रांतीकारी चळवळीत येशूबाई सावरकरांचे कार्य : एक अभ्यास — ३४
डॉ. गंगणे आर. व्ही.

13. ग्रामीण महिलांच्या आरोग्य विषयक समस्या: कारणे व उपाय योजना — 38
प्रा. डॉ. पंढरी गुट्टे

14. "भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान" — 41
प्रा. केशव देविदासराव पावडे

15. परभणी जिल्ह्यातील लिंग-गुणोत्तर एक भौगोलिक अभ्यास — 45
प्रा. डॉ. खंदारे सिंधु परसराम

47. ज्ञान सरस्वती सरोजनी नायडू यांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान 146
प्रा.महेंद्र प.देशपांडे

48. आर्थिक विकासात औद्योगिकरणाची भूमिका 150
डॉ.सुरेश टी.सागाले

49. पारंपरिक ग्रंथालयांमध्ये ई संसाधनांचा वापर : काळाची गरज १५२
प्रा.अनिल गेवळीकर

50. भारताच्या स्थुल राष्ट्रीय उत्पादनात कृषी क्षेत्राचे योगदान 154
डॉ. संजय मोतीराम दांडगे , डॉ. जगताप बी.एस.

51. 'योगशास्त्रीय दृष्टीकोनातून आहार विवेचन' 157
पल्लवी ज्ञानोबा सुरवसे

52. मुलभूत हक्काच्या संरक्षणात सर्वोच्च न्यायालयाची भुमिका 159

53. झोडगे रामेश्वर सिद्धेश्वर

54. मानव विकास ( Human Development) 161
प्रा.डॉ.बी.बी.लोंखडे

55. मराठवाडा मुक्ती संग्रामात वडवणी तालुक्याचा सहभाग विशेष संदर्भ - स्वातंत्र्य सैनिक - श्री. रामकृष्ण नारायण खाटवकर (चिंचाळा) 163
डॉ.भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी

56. जागतिक विकासात महिलांचे प्रषासकीय आणि व्यवस्थापकीय क्षेत्रातील योगदान:विषेष संदर्भ मेरी पार्कर फॉलेट. 166
प्रा. डॉ. सांगळे भगवान श्रीपती

57. आधुनिक ग्रंथालयातील डिजीटल मिडीयाची साधणे 171
प्रा. बिडवे मारुती शिवाजीराव

58. नाट्यसंहितेतील रंगभाषेची भूमिका :एक अभ्यास 174
प्रा. डॉ.ज्ञानेश्वर लक्ष्मण सोनवणे

59. भारतीय शेती विकास स्थितांतराचा ऐतिहासिक आढावा 175
डॉ. डी.बी. तांदुळजेकर

60. पर्यावरण व्यवस्थापन काळाची गरज 178
प्रो. डॉ. उत्तम शंकर साळवे, प्रा. शिंदे नारायण भर्तरीनाथ

61. नांदेड जिल्ह्यातील हवामानातील बदल : एक भौगोलिक अभ्यास 181
प्रा. डॉ. कानवटे यु.एस.

मूद के

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 22 , Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# पारंपरिक ग्रंथालयांमध्ये ई संसाधनांचा वापर : काळाची गरज

प्रा.अनिल जेवळीकर
ग्रंथपाल, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी

---

**सार:**

सध्याच्या माहिती युगात माहिती तंत्रज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात हे मोठा बदल दिसून येत आहे. इतर क्षेत्राप्रमाणेच ग्रंथालय क्षेत्रातही माहिती तंत्रज्ञानाचा मोठा प्रभाव दिसून येत आहे. पारंपारिक ग्रंथालयात वापरल्या जाणाऱ्या संकल्पना या आधुनिक पद्धतीने कशा वापरता येतील याचा विचार समोर येऊ लागला. संगणक क्षेत्रात झालेली मोठी प्रगती आणि त्याला इंटरनेट ची मिळालेली जोड यामुळे माहिती च्या स्वरूपात अमूलाग्र झाला त्यामुळे पारंपारिक ग्रंथालयात वापरली जाणारी छापील ग्रंथ, नियतकालिके आता इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मिळण्यास सुरुवात झाली . सद्यस्थितीत ग्रंथालयात ही साधने वापरणे ही काळाची गरज बनली आहेत. पारंपारिक ग्रंथालयाच्या मर्यादा लक्षात घेता इलेक्ट्रॉनिक साधने वापरणे अत्यंत गरजेचे आहे तरच खऱ्या अर्थाने ग्रंथालय आपल्या वाचकांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करू शकतील.

शोध संज्ञा:- ई संसाधने, ई प्रकाशने, माहिती तंत्रज्ञान.

**प्रस्तावना:**

संगणक, इंटरनेट व संप्रेषण तंत्रज्ञान यामुळे प्रत्येक क्षेत्रात अतिशय मोठा बदल होत आहे. मग यास ग्रंथालय तरी कसे अपवाद राहतील. सद्यस्थिती ग्रंथालयांनी आधुनिकतेची कास धरली आहे. वाचकांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रंथालय आणि आधुनिक तंत्रज्ञान वापरणे गरजेचे आहे. पारंपरिक ग्रंथालयात असणारे छापील साहित्य कुठेतरी ते कमी पडू लागले त्याच्या मर्यादा लक्षात घेता ग्रंथालयांनी ई साधनांचा वापर आपल्या वाचकांसाठी केला पाहिजे. या साधनांच्या वापरामुळे पैसा, वेळ, श्रम याची निश्चितपणे बचत होत असते. सध्याच्या माहिती युगात ग्रंथालय ही संकल्पना अतिशय विस्तृत झाली आहे. तसेच सद्यस्थितीत उपलब्ध असणारे डिजिटल किंवा इलेक्ट्रॉनिक माहिती फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहे त्यामुळे हवी ती माहिती शोधण्यासाठी इंटरनेटवर अवलंबून न राहता ग्रंथालयामार्फत नेमकी माहिती शोधण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. सद्यस्थिती आपल्या वाचकांना वेगवेगळ्या प्रकारचे ई- संसाधने वाचकांना उपलब्ध करून देतात परंतु वाचकांना हवी असलेली नेमकी माहिती शोधण्यासाठी ग्रंथालयांनी प्रयत्न केले पाहिजेत.

**ई-संसाधने:**

ई-संसाधने ही संकल्पना अतिशय व्यापक आहे. यामध्ये ई-जर्नल्स, डेटाबेस तसेच प्रतिमा स्थिर चलाचित्रांचा समूह आणि तत्सम बहुसंज्ञापन माध्यमातील माहितीचा इलेक्ट्रॉनिक किंवा आणखी स्वरूपातील सीडी-रॉम किंवा इंटरनेटवर सशुल्क किंवा निशुल्क उपलब्ध हातात त्यास इलेक्ट्रॉनिक्स संसाधने म्हणतात.

**ई- संसाधनांचे प्रकार:**

१) ई बुक्स २) ई जर्नल्स ३) इंटरनेट एक्सेस ४) डेटाबेसेस ५) ई- न्युज पेपर याशिवाय कन्सोरशिया, रिसोर्स शेअरिंग, ऑनलाइन इंटरनेट एक्सेस या बाबीसुद्धा या मध्ये येतात.

**ई-संसाधनाचे फायदे:**

१. सहज उपलब्धता
२. संशोधन कार्यात ज्ञानप्राप्ती
३. उच्च सायटेशन प्राप्ती
४. जलद प्रकाशन व सहज डाउनलोड
५. लेखकांचे लेखाधिकार सुरक्षित
६. वाङमय चोरीवर आळा

**ई-संसाधनाचा ग्रंथालयात वापर:-**

मोठ्या प्रमाणात ई-संसाधनाची निर्मिती सध्या काळात होत आहे. ग्रंथालयांनी त्याचा वापर केल्यामुळे वाचकांचा ग्रंथालय कडे ओढा वाढणार आहे. संशोधन कार्यात तसेच शैक्षणिक कार्यात या साधनांचा वापर करणे संशोधकांना व ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांना गरजेचे ठरले आहे . माहिती व ज्ञान शाखांची व्याप्तीही सतत वाढत आहे वेगवेगळ्या आणि शाखांचा उदय सध्यस्थितीत होत आहे या सर्व बाबींचा विचार करता पारंपारिक ग्रंथालयाच्या मर्यादा लक्षात येतात या दूर करण्यासाठीई-संसाधनाचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे.

**ई-संसाधनाची ग्रंथालयात आवश्यकता:**

अद्यावत माहिती मिळवण्यासाठी छापील पुस्तके हे कुठेतरी कमी पडत असतात अशा वेळेस नेमकी व अद्यावत माहिती मिळवण्यासाठी झाडांचा उपयोग होतो. अगदी कमी वेळात नेमकी माहिती गरजेचे असते यासाठी ही साधने अत्यंत उपयोगाची आहेत आणि याचा वापर एकाच वेळेस अनेक वाचक कुठल्याही वेळी करू शकतात. त्याचबरोबर ज्यावेळेस एखादे ग्रंथालय उपार्जित करते त्यावेळेस नेमकी माहिती वाचकांना मिळते का नाही पाणी सुद्धा अत्यंत गरजेचे आहे कारण माहितीचा प्रचंड साठ्यातून नेमकी व परिपूर्ण माहिती वाचकांना पुरवणे हा ग्रंथालयांची जबाबदारी आहे. त्यासाठी आवश्यक असणारी साधन सामग्री ग्रंथालयाकडे असणे आवश्यक आहे. वाचकांच्या ज्ञानाची भूक भागवण्याचे काम ग्रंथालयांनी केले तरच खऱ्या अर्थाने ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांच्या पंचसूत्रीचे उपयोजन झाले असे म्हणता येईल.

**सारांशः**

सद्यस्थितीत ग्रंथालयांनी आधुनिकतेची कास धरणे आवश्यक आहे. माहिती युगात मिळणारी प्रचंड माहितीचे साठे त्यातून नेमकी माहिती मिळवण्यासाठी व वाचकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयांनी पारंपारिक ज्ञानसाहित्या बरोबर आधुनिक ई-संसाधनाचा केला पाहिजे.

**संदर्भसूचीः**


- पानगे (बी.एम.) - डिजिटल ग्रंथालये, ज्ञानोपयोगी अंक १ ला, जुन-जुलै-ऑगस्ट-२००२, पृ.३०-४७.
- पाटील (एस.के) आणि चिकटे (आर.व्ही.) - डिजिटल ग्रंथालयेः आधुनिक काळाजी गरज, ज्ञानोपयोगी अंक ३ रा, डिसेंबर-जानेवारी-फेब्रुवारी २००४, पृ.५२-६६.
- फडके (द.ना) - ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, युनिवर्सल प्रकाशन, पुणे. २००७ पृ.३०२-३४०.
- Botkar (K. R.) - Microelectronic: Digital and Analog" Delhi; Khunna, १९९१, P. १३४६.
- Deegan (Marilyn) & Tunner (Simmon) - Digital futures : Strategies for the Information Age"Londan : Library. Association Publishing. २००२-p. २७६.
- Iyer (V. K.) - "Library Information Technology. Tools of Tomorrow". Rajat Publications Delhi., १९९९; P. २२४-२५४.
- Jeevan (V. K.J.) - "Digital Libraries"-ESS ESS publication, New Delhi. २००३, P. ३१०-३४९.
- Lakshmi Vijay & Jindal (S. C.) - "Digital Libraries". Isha Books publication, Delhi, २००४ p. ७८-११७.
- Madalli Devica. P. - "Digital Library Software : Dspace, E-prints, GSDL, and fedora", block IV web theighing.
- Pareckh Harsha - "Digitazation : An overview of Isues". Callibar २००१, १५-१६ March २००१, Pune, Inflibinit Centre, Ahmedabad, P. १-६.